**ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई येथे डिंसेबर,२०१५ ते मार्च ,२०१६ या ४ महिन्याच्या कालावधीसाठी राज्यस्तरीय पंचायत (अनुसूचित क्षेत्राचा विस्तार ) अधिनियम १९९६ ( पेसा ) कक्ष स्थापन करण्यासाठी निधी मंजूर करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक :राज्यपा २०१५/प्र.क्र.१२०/का-१६**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई
दिनांक : १८ डिंसेबर ,२०१५

<u>वाचा</u> :- १.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : आरएजे१०२२/मुंमस/प्र.क्र.१७/२०११/ २०अ/, दिनांक ३१.१.२०१२

२. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक : व्हीआयपी २०१२/ प्र.क्र. ३७/ का-१६,दिनांक ५ मार्च,२०१३

३. मा. राज्यपाल कार्यालय यांचे पत्र क्र. RB/DB/e-१३०१३(१) (२०१५)/Psmc ६thmeeting/Minutes/२६ November/१०८८, दिनांक ९ डिंसेबर, २०१५

<u>प्रस्तावना</u> :

केंद्र शासनाच्या आदिवासी विकास मंत्रालयाने दिलेल्या सुचनेस अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ३१.१.२०१२ च्या शासन निर्णयान्वये मा. राज्यपाल यांच्या कार्यालयात "आदिवासी कक्ष" स्थापन करण्यात आला आहे. सदर आदिवासी कक्षामार्फत करावयाची कार्यवाही तसेच या कक्षामार्फत राबविण्यात येणा-या पथदर्शी प्रकल्पाबाबत मार्गदर्शक तत्वे आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ५.३.२०१३ च्या शासन निर्णयान्वये नमूद करण्यात आलेले असून मा. प्रधान सचिव ( आ.वि.) यांच्या अध्यक्षतेखाली पथदर्शी प्रकल्प मंजूरी व सनियंत्रण समिती गठित केलेली आहे.

पथदर्शी प्रकल्प मंजूरी व सनियंत्रण सिमितीची ६ वी बैठक दिनांक २६.११.२०१५ रोजी आयोजित करण्यात आली. संदर्भाधीन क्रमांक ३ नुसार तल कार्यवृत्तातील ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या मंत्रालयीन स्तरावर राज्यस्तरीय पेसा (PESA) कक्ष स्थापन करण्यासाठी आदिवासी उपयोजनेतून निधी देणेबाबतच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. त्यास अनुसरुन ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या मंत्रालयीन स्तरावर राज्यस्तरीय पेसा कक्ष स्थापन करण्यासाठी आदिवासी उपयोजनेतून निधी मंजूर करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय**</u> **:-**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पेसा कायदयाची क्षेत्रीय स्तरावर कालबध्द व प्रभावी अंमलबजावणी करीता डिसेंबर २०१५ ते मार्च २०१६ या ४ महिन्यांचे कालावधीकरीता ग्राम विकास

व जलसंधारण विभाग , मंत्रालय, मुंबई येथे राज्यस्तरीय पेसा कक्ष स्थापन करण्यासाठी तसेच त्याकरीता राज्य समन्वयक , सहाय्यक समन्वयक व कार्यालयीन सहाय्यक / डाटा एंट्री ऑपरेटर ही पदे प्रस्तावित केली असून त्यामध्ये राज्य समन्वयक हे पद अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांमधून प्रतिनियुक्तीने तसेच सहाय्यक समन्वयक हे पद विस्तार अधिकारी यामधून प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत व कार्यालयीन सहाय्यक हे पद कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यासाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावासाठी रु. ६,२४,०००/- (अक्षरी रु. सहा लक्ष चोवीस हजार फक्त ) एवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. राज्य स्तरावरील पेसा कक्ष खालीलप्रमाणे कामकाज पार पाडेल :-

- ग्रामसभेकडुन निर्माण करण्यात येणा-या नवीन पेसा गाव निर्मितीचा आढावा घेणे,
- प्राप्त गौण वनोपज विक्री आणि विल्हेवाटीचा आढावा घेणे,
- सर्व पेसा गावांमध्ये ग्रामसभा कोषाची स्थापना करणे त्यासाठी तांत्रिक मदत आणि त्याचा पारदर्शक वापर करणे याबाबतचा आढावा घेणे,
- ग्रामसभेकडुन करण्यात येणा-या जमीन संसाधनाचे व्यवस्थापनाचा आढावा घेणे,
- सामाजिक लेखा परिक्षण व ग्रामसभा सक्षमीकरण करणे,

३. तसेच सदर योजनेचे स्वरुप , निकष तसेच प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्या यासंदर्भातील अटी व शर्ती या ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून निश्चीत करण्यात येतील. पेसा ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन देण्यात येणा-या आदिवासी उपयोजनेच्या ५ % अबंध निधीचे व्यवस्थापन , खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र इ. बाबींचे समन्वय पेसा कक्षाने करणे आवश्यक राहील.

४. सदर योजनेचा अपेक्षित खर्च :-

| पद | पद भरण्यासाठी येणारा खर्च | शेरा |
|---|---|---|
| राज्य समन्वयक पेसा | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी स्तर वेतनश्रेणी १५६००-३९५०० ( रु.७०,०००/ ) (दरमहा ) | ग्राम विकास विभागाच्या अधिनस्त असणा-या कार्यालयामधील प्रतिनियुक्तीने भरण्यात येईल. |
| सहाय्यक समन्वक पेसा | विस्तार अधिकारी स्तर ( रु.४२०००/- ) दरमहा | जिल्हा परिषद प्रतिनियुक्तीने |
| कार्यालयीन सहाय्यक , डेटा एंट्री ऑपरेटर | कंत्राटी पद- रु.१८,०००/- दरमहा | कंत्राटी पध्दतीने भरण्यात येईल. |

५. वरील प्रमाणे तीनही कर्मचा-यांसाठी दरमहा रु. १,३०,०००/- एवढा खर्च होईल . त्याव्यतिरिक्त वाहतुक आणि आकस्मिक कार्यालयीन खर्चाकरिता ( पगाराच्या २० % ) रु.२६,०००/- असे एकूण रु.१,५६,०००/-) इतका प्रतिमहा खर्च असेल.

**एकूण आर्थिक भार-** (प्रकल्पाचा एकुण खर्च )

1) राज्य समन्वयक पेसा - ७०००० X १ X ४= २८००००/-
2) सहाय्यक समन्वक पेसा- ४२००० X १ X ४= १६८०००/-
3) कार्यालयीन सहाय्यक, डेटा एंट्री ऑपरेटर (कंत्राटी पद) - १८००० X १ X ४= ७२०००/-

अशा एकूण रु. ५,२०,००० + रु. १,०४,००० (वाहतुक आणि आकस्मिक कार्यालयीन खर्चाकरिता ( पगाराच्या २० %) = रुपये ६,२४,०००/- (रुपये सहा लाख चोवीस हजार ) इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

६. सदर प्रकल्पाचे सनियंत्रण प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचेकडून करण्यात येणार असून सदर प्रकल्पाची अंमलबजावणी राज्य समन्वयक अधिकारी (पेसा कक्ष) यांचेमार्फत करण्यात येणार आहे. सदर योजनेकरीता आदिवासी विकास विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांच्या अधिनस्त ठेवण्यात येईल. नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त ठेवलेला निधी मान्यता दिलेल्या बाबींवर खर्च करावा आणि त्याबाबतचा मासिक अहवाल ज्या महिन्यात खर्च झाला असेल त्याच्या पुढील १० तारखेपर्यंत आदिवासी विकास विभागास सादर करावा.

७. पेसा कायदयाची क्षेत्रीय स्तरावर गतिमान पणे अंमलबजावणी करण्याकरीता राज्यस्तरीय पेसा कक्ष स्थापन करण्याच्या योजनेसाठी होणारा खर्च मागणी क्र.टि-५, २२२५-अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व इतर मगासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना -०२, अनुसूचित जमातीचे कल्याण -७९६, जनजाति क्षेत्र उपयोजना (०१) जनजाति क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना- (०१) (५३)आदिवासी कक्षामार्फत राज्यातील अनुसूचित क्षेत्रामध्ये पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी ( २२२५-डी ३६९ )-३१ सहाय्यक अनुदाने ( वेतनेतर ) या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या चालू आर्थिक वर्षाकरीता केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा क्रमांक अर्थसं२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १७ एप्रिल,२०१५ च्या परिपत्रकातील अटीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२१९१२०३२४२८२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f05a6913f9dee1f453c9a1c5a89d8c4897737ba8e4ac0edf3f2c6e69e25f4108, cn=Ravindra Digambarrao Aute
Date: 2015.12.19 12:06:37 +05'30'

**( रविंद्र दि.औटे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री ( आवि ) यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री ( ग्राम विकास ) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री ( आवि ) यांचे खाजगी सचिव
६. महालेखापाल लेखापरिक्षा , ( लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र -१, मुंबई
७. महालेखापाल लेखापरिक्षा , ( लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र-२, नागपूर,
८. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
११.जिल्हाधिकारी, नाशिक,अमरावती , यवतमाळ,गडचिरोली, चंद्रपूर, नंदुरबार, धुळे, जळगांव, अहमदनगर, नांदेड, पुणे ,पालघर,ठाणे
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक,अमरावती , यवतमाळ,गडचिरोली, चंद्रपूर, नंदुरबार, धुळे, जळगांव, अहमदनगर, नांदेड, पुणे ,पालघर,ठाणे
१३.उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) अमरावती , गडचिरोली, गोंदिया, नागपूर, नंदुरबार, धुळे, जळगांव, अहमदनगर, नांदेड, पुणे व भंडारा
१४.सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास
१५.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१६.जिल्हा कोषगार अधिकारी, मुंबई
१७.सर्व उप सचिव/अवर सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८.कक्ष अधिकारी, (का-६ ) अर्थसंकल्प शाखा, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
१९. कक्ष अधिकारी, (का-१७ ) आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
२०.निवड नस्ती कार्यासन१६-